## आपलं स्वतःच दुकान



आपण सर्वजण कधीनाकधी दुकानात गेलोच आहोत. कधी साखर, बिस्कीट , चॉकलेट यांसारख्या छोट्या छोट्या गोष्टी आणण्यासाठी किंवा कधीकधी आपल्या आई बाबांबरोबर एखादी मोठी वस्तू आणण्यासाठी, हो ना? आपल्या घरात आपण सर्वत्र पाहिलं तर आपल्याला बऱ्याच छोट्या मोठ्या गोष्टी दिसून येतात जसं कि साबण, टूथपेस्ट, भिंतीवरचे घड्याळ, झोपण्याचा पलंग, कपाट, पंखा इत्यादी. तुम्हाला कधी तुमच्या घरच्यांनी कपाट, पंखा किंवा टीव्ही वगैरे अशा मोठ्या वस्तू विकत आणण्यासाठी दुकानाला पाठवले आहे का? नक्कीच नाही पाठवले असणार, हो ना? हे असं कशामुळे बरं? चॉकलेट बिस्कीट वगैरे विकत घेणे आणि टेबल, कपाट वगैरे विकत घेणे यात काही फरक आहे का? तुम्हाला या दोन गोष्टींमधला फरक सांगता येईल का?

ब्रेड किंवा बिस्कीट विकत घेण्यासाठी आपल्याला कमी पैसे लागतात तर टीव्ही किंवा कपाट विकत घेण्यासाठी आपल्याला भरपूर पैसे लागतात हे तुम्हाला माहिती आहेच आणि भरपूर पैशांची देवाण घेवाण करण्यासाठी आपल्याला त्याची सर्व आकडेमोड माहित असणे गरजेचे असते हो ना?

**चला तर मग आपण आज हे सारं गणित समजून घेऊया, आणि आपलं स्वतःच छोटंसं दुकान सुरु करून त्यांच्या किमती वगैरे समजून घेऊया.**

सर्वप्रथम आपले स्वतःचे दुकान सुरु करण्यासाठी आपल्याला कोणकोणती तयारी करावी लागेल असे तुम्हाला वाटते?

आपल्याला सुरवातीला दुकान सुरु करण्यासाठी आपल्या घरातीलच वस्तू वापरायच्या आहेत. त्यासाठी तुम्ही सुरवातीला हे ठरवा कि आपल्याला नेमकं कशाचं दुकान सुरु करायचं आहे, कारण आपण बाजारात गेल्यावर पाहतो कि वेगवेगळ्या गोष्टी मिळण्यासाठी वेगवेगळी दुकानं उपलब्ध असतात. जसं की किराणा दुकानात टीव्ही विकत मिळत नाहीत आणि मोबाईल च्या दुकानात साखर विकत मिळत नाही.

एकदा तुमचं कशाचं दुकान सुरु करायचं आहे हे ठरलं कि मग त्यानुसार आपल्या घरात त्याविषयीच्या कोणकोणत्या गोष्टी आहेत याची एक यादी बनवा.

समजा तुम्हाला खेळणीचे दुकान सुरु करायचं असेल तर तुमच्या घरात जे जे खेळणीचे सामान उपलब्ध आहे, त्याची एक यादी बनवा. खेळणीच्या सामानामध्ये खेळणीचे जिराफ, हत्ती, टेडी बिअर, फुगे, वेगवेगळया गाड्या, बाहुली यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो. तुम्ही हि यादी बनविण्यासाठी तुमच्या घरच्या मोठ्या माणसांची देखील मदत घेऊ शकता. आणि सोबतच तुमच्या पालकांना या गोष्टींच्या किमती देखील विचारून घ्या. काही गोष्टींच्या किमती काय असतील याचा तुम्ही स्वतः विचार करून ठेवा आणि नंतर याच किमती तुमच्या पालकांना विचारून त्याची पडताळणी करून घ्या.





**आता एका कागदावर या सर्व गोष्टींची यादी करून त्याच्या समोर त्यांच्या किमती लिहून काढा.**


यानंतर एका बोर्ड वर किंवा तत्सम फळयावर तुमच्या दुकानाचे नाव, ग्राहकांना अभिवादन करणारा एखादा संदेश लिहून त्यानंतर तुमच्या दुकानात कोणकोणत्या गोष्टी विकत मिळतात याची माहिती लिहा.

आता आपल्याला ज्या ज्या वस्तू विकायच्या आहेत त्याची एक मजेशीर यादी बनवायची आहे. त्यासाठी तुम्हाला एका कागदावर विक्रीसाठी असणाऱ्या गोष्टीचे एक चित्र काढून त्याच्या खाली त्या गोष्टीचे नाव आणि किंमत लिहायची आहे.

उदाहरणादाखल आपण खालील प्रमाणे चित्रांसहित यादी करू शकतो



**हत्ती - किंमत ३० रुपये**



**कार - किंमत २० रुपये**



**फुगा - किंमत ५ रुपये**



**टेडी बिअर - किंमत ४० रुपये**

आपल्याला वर दाखविल्याप्रमाणेच चित्रांसहित यादी बनवायची आहे आणि त्यासाठी तुम्ही पेन्सिल, पेन किंवा अधिक सुंदर दिसण्यासाठी कलर पेन चा देखील वापर करू शकता. वाटल्यास हि यादी बनविताना तुम्ही वस्तू समोर धरून मग तिचे चित्र रेखाटू शकता. चित्र सुबकच यावं असं हि काही नाहीये पण त्या चित्रांमधून ती वस्तू कोणती हे ओळखायला आलं तर छान होईल. चित्र पूर्ण झाल्यानंतर तुम्ही या यादीला विविध डिजाईन काढून अधिक सुंदर देखील बनवू शकता.

**<u>आता आपल्याला दोन वेगवेगळ्या वस्तूंची बेरीज करायला शिकायचीये.</u>**

समजा तुम्ही दुकानावर एक पेन्सिल आणि एक खोडरबर आणायला गेलात. पेन्सिल ची किंमत ५ रुपये आहे आणि खोडरबर ची किंमत ३ रुपये आहे तर दुकानदार तुम्हाला किती रुपये झाले म्हणून सांगेल? ८ रुपये हो ना? म्हणजे त्या दुकानदाराने पेन्सिल आणि खोडरबर ची किंमत एकत्रित करून तुम्हाला सांगितली असणार. म्हणजेच ५ अधिक ३ बरोबर ८, हो ना?

आता तुम्हाला तुमच्या एखाद्या मित्राची किंवा कुटुंबीयांची मदत घेऊन अशा दोन वेगवेगळ्या गोष्टींची किंमत एकत्रित सांगण्याचा सराव करायचा आहे.समजा एक साबण २० रुपयाला असेल आणि एक ब्रेडपूडा ३० रुपयाला असेल तर त्या दोघांची किंमत एकत्रित मिळून ५० रुपये होईल. अशा वेगवेगळ्या गोष्टींची किंमत सांगण्याचा सराव कमीतकमी २० वेळेस करा म्हणजे तुम्हाला हि गोष्ट पक्की ध्यानात राहील. जर तुम्हाला २ गोष्टींची एकत्रित किंमत सांगणे जमले असेल तर तुम्ही एकत्रित तीन गोष्टींची किंमत सांगण्याचा सराव देखील करू शकता. एकदा मित्राच्या मदतीने हा सराव पूर्ण झाला कि मग तुम्ही एकटे देखील हा सराव करून पहा.

**<u>आता आपण थोडीशी वजाबाकी शिकूया</u>**

समजा एखाद्या ग्राहकाने दोन वेगवेगळ्या गोष्टीची किंमत विचारली आणि त्या दोघांच्या किमतीमध्ये किती फरक आहे ते विचारले तर?

हि परिस्थिती समजून घेण्यासाठी पुन्हा एकदा तुम्हाला तुमच्या मित्राची किंवा घरच्यांची मदत घ्यावी लागणार आहे. आधी तुमचा मित्र तुम्हाला ब्रेडपूडा हा साबणापेक्षा किती रुपयाने महाग आहे हे विचारेल. त्यावेळी तुम्ही त्याला ब्रेडपुडा ३० रुपये वजा साबण २० रुपये म्हणजेच ब्रेडपूडा हा साबणापेक्षा १० रुपयाने महाग आहे असे सांगणे अपेक्षित आहे. असाच विविध गोष्टींच्या वजाबाकीची सराव तुम्ही कमीतकमी २० वेळेस करणे अपेक्षित आहे.  एकदा मित्राच्या मदतीने हा सराव पूर्ण झाला कि मग तुम्ही एकटे देखील हा सराव करून पहा. हि वजाबाकी एकदा का तुमच्या पक्की ध्यानात आली की मग आपल्या दुकानातील सामानाची यादी या किमतीनुसार तुम्ही पुन्हा बनवा. म्हणजे जी गोष्ट सर्वात जास्त महाग आहे ती सुरवातीला लिहा आणि जी गोष्ट त्यापेक्षा जरा कमी किमतीची आहे ती पहिलीच्या खाली लिहा. अशा प्रकारे सर्व गोष्टी त्यांच्या किमतीच्या उतरत्या क्रमाने लिहून काढा. हि उतरत्या क्रमाची यादी पूर्ण झाल्यावर दोन सलग गोष्टींमधील फरक तेथेच समोर लिहून काढा. हे कसे लिहायचे हे समजण्यासाठी पुढील यादी पहा.

१) टेडी बिअर - ४० रुपये

२) हत्ती - ३० रुपये

३) कार - २० रुपये

४) फुगा - ५ रुपये

⇨ १० रुपये

⇨ १० रुपये

⇨ १५ रुपये

आता आपल्याला आणखी वेगळ्या पद्धतीचा सर्व करून पहायचा आहे. तुमचा मित्र तुम्हाला अमुक एक रक्कम त्याच्याजवळ आहे असं सांगेल. तुम्हाला त्या रकमेत तुमच्या दुकानातील जास्तीत जास्त किती वस्तू येऊ शकतील हे सांगायचे आहे. पण एक गोष्ट लक्षात असू द्या, मित्राजवळील रकमेपेक्षा जास्त किमतीच्या वस्तू होऊ नयेत याची काळजी घ्या.